**नियमित दिवाणी दावा क्र. ६२१/२०२२ मध्ये नि. क्र. ३१ कडील अर्जावर आदेश**

१) प्रस्तुतचा अर्ज वादीतर्फे जादा सरतपासणीचे शपथपत्र दाखल करण्यास परवानगी मिळण्याकरीता दाखल केला आहे.

२) प्रतिवादी क्र. १ तर्फे प्रस्तुत अर्जास दिलेल्या म्हणण्यामध्ये प्रस्तुत अर्जास तीव्र हरकत घेतली आहे व अर्ज नामंजुर करण्याची विनंती केली आहे.

३) प्रस्तुत अर्जाच्या कामी दोन्ही पक्षातील विद्वान वकीलांचा युक्तीवाद ऐकला. रोजनाम्याचे व अभिलेखावरील कागदपत्रांचे अवलोकन केले.

४) रोजनाम्याचे व अभिलेखावरील कागदपत्रांचे अवलोकन करता असे दिसून येते की, प्रस्तुत प्रकरणात महाराष्ट्र शासनतर्फे जिल्हाधिकारी, सातारा यांच्यावर समन्सची बजावणी होऊनही ते या कामी हजर न झाल्याने प्रस्तुत दावा प्रतिवादी क्र. १ विरुद्ध एकतर्फा चालविण्याबाबत निशाणी क्र. १ वर दिनांक ०३/०४/२०२३ रोजी आदेश पारीत केला आहे. त्यानंतर वादी क्र. १ ने प्रस्तुत प्रकरणात निशाणी क्र. २१ कडे सरतपासणीचे शपथपत्र दाखल केले आहे. त्यानंतर प्रतिवादी क्र. १ ने या प्रकरणात हजर होऊन त्यांची लेखी कैफीयत दाखल केली आहे व त्यानुसार निशाणी क्र. ३० कडे वादाचे मुद्दे निश्चित केले आहेत. त्यामुळे अशा परिस्थितीत माझ्या मते प्रतिवादी क्र. १ ने त्यांची लेखी कैफीयत दाखल केल्यानंतर त्या अनुषंगाने वादी क्र. १ ने जादा सरतपासणीचे प्रतिज्ञापत्र दाखल करण्यास परवानगी मिळण्याकरीता केलेली विनंती समर्थनीय आहे. त्यामुळे वरील नमुद कारणांमुळे माझ्या मते प्रस्तुत अर्ज समर्थनीय आहे व तो मंजूर होण्यास पात्र आहे. सबब खालीलप्रमाणे आदेश पारीत करण्यात येतो.

# <u>आदेश</u>

१) प्रस्तुतचा अर्ज मंजूर करण्यात येतो व त्यानुसार वादी क्र. १ ला जादा सरतपासणीचे शपथपत्र दाखल करण्यास परवानगी देण्यात येते.

२) वरीलप्रमाणे न्यायालयात आदेशाचे कथन करुन घोषीत करण्यात आला.

Digitally signed by PANDURANG LIMBAJI GHULE
Date: 2025.09.04 16:06:00 +0530

दिनांकः– ०४/०९/२०२५ (पां. लिं. घुले)

ठिकाणः– कराड २रे सह दि. न्या. व.स्तर, कराड.